RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ४९(२)] शुक्रवार, मे ५, २०१७/वैशाख १५, शके १९३९ [पृष्ठे ६०, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ मे २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक बीएड-४६१६/प्र.क्र.१(भाग-२)/मशि-२.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) च्या कलम २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक बीएड. ४६१६/प्र.क्र.१/मशि-२, दिनांक ६ मे २०१६ चे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन, याद्वारे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण यांमधील व्यावसायिक पदवी शिक्षण प्रशिक्षण अध्ययनक्रम (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी) आणि शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण यांमधील व्यावसायिक पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रम (शिक्षणशास्त्र पदव्युतर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) यांच्या प्रथम वर्षासाठी द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ**

(१) या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन], नियम, २०१७ असे म्हणावे.

(२) ते दिनांक ५ मे २०१७ पासून अंमलात येतील.

**२. व्याख्या**

(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८), असा आहे ;

(ख) " प्रवेश उपस्थिती केंद्र " याचा अर्थ, जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्राची पडताळणी करून आणि शुल्काचा भरणा करून प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित राहील असे केंद्र, असा आहे ;

(ग) "अखिल भारतीय जागा " याचा अर्थ, कोणत्याही पात्र भारतीय उमेदवारास उपलब्ध होणाऱ्या जागा, असा आहे ;

(घ) "आवेदनपत्राचा नमुना" याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता संगणकीय पद्धतीने (ऑनलाईन) भरावयाचा विहित नमुना, असा आहे ;

(ङ) "स्वायत्त संस्था" याचा अर्थ, ज्या संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे अशी संस्था, असा आहे ;

(च) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) जागा" याचा अर्थ, सक्षम प्राधिकाऱ्याकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) ज्या जागांवर प्रवेश देण्यात येतात अशा जागा, असा आहे ;

(छ) "पाठ्यक्रम" याचा अर्थ, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक अध्ययनक्रम अर्थात, शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.), शारीरिक शिक्षण पदवी (बी.पी.एड.), शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.एड.), शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी (एम.पी.एड.) असा आहे ;

(ज) "विभाग" याचा अर्थ, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) "ईएलसीटी" याचा अर्थ, शिक्षणशास्त्राच्या इंग्रजी माध्यमाच्या महाविद्यालयांत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने घेतलेली इंग्रजी भाषा ज्ञान चाचणी परीक्षा, असा आहे ;

(ञ) "पात्र उमेदवार" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अनुसार शासनाने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार विविध व्यावसायिक पाठ्यक्रमांसाठी पात्र असणारे उमेदवार, असा आहे ;

(ट) "सुविधा केंद्र" याचा अर्थ, जेथे आवेदनपत्रासंबंधातील सामग्रीची विक्री, संगणकीय पद्धतीने (ऑनलाईन) अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी व तक्रारींचे निवारण करणे यांसारख्या सेवा पुरविल्या जातात, असे केंद्र, असा आहे ;

(ठ) "मूळ विद्यापीठ" याचा अर्थ, यातील नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार विद्यापीठ क्षेत्र, असा आहे ;

(ड) "एचएससी" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा अथवा मान्यताप्राप्त मंडळाकडून देण्यात येणारे, त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे ;

(ढ) "संस्थास्तरीय कोटा" याचा अर्थ, शासनाने किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी जाहीर केल्यानुसार संस्थास्तरावर पात्र उमेदवारांच्या प्रवेशासाठी उपलब्ध असणाऱ्या जागा, असा आहे ;

(ण) "परस्पर गुणवत्ता" याचा अर्थ, विविधवर्ग/प्रवर्गातील उमेदवारांचा संबंधात गुणानुक्रम असा आहे ;

(त) "अल्पसंख्याकांसाठी जागा" याचा अर्थ, ती संस्था ज्या अल्पसंख्याक समाजाकरिता आहे अशा, राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता राखून ठेवलेल्या जागा, असा आहे ;

(थ) "बिगर स्वायत्त संस्था" याचा अर्थ, ज्या संस्था स्वायत्त संस्था नाहीत अशा संस्था, असा आहे ;

(द) "मूळ विद्यापिठाबाहेरील (ओएचयू)" याचा अर्थ, मूळ विद्यापीठ क्षेत्राबाहेरील क्षेत्र, असा आहे ;

(ध) "भारताचे समुद्रपार नागरिक" याचा अर्थ, केंद्र सरकारने नागरिकत्व अधिनियम, १९५५ च्या कलम ७ क अनुसार घोषित केलेला, भारताचे समुद्रपार नागरिकत्व म्हणून नोंदणी केलेला उमेदवार किंवा व्यक्ती असा असून, त्यामध्ये भारतीय वंशाच्या व्यक्तींचा समावेश होतो ;

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, सर्व विद्यमान भारतीय वंशाच्या व्यक्ती म्हणजे, ज्या गृह मंत्रालय, भारत सरकार, अधिसूचना क्र.२६११/०४/९८-एफ (I) , दिनांक १९ ऑगस्ट, २००२ अनुसार नोंदणी केलेली असून त्या कार्डधारक आहेत आणि ज्यांना आता गृह मंत्रालय, भारत सरकार, अधिसूचना क्र २५०१४/९/२०१४-एफ(I), दिनांक ९ जानेवारी २०१५ अनुसार भारताचे कार्डधारक समुद्रपार नागरिक असल्याचे समजण्यात येईल ;

(न) "शारीरिक परीक्षा" याचा अर्थ, सक्षम प्राधिकाऱ्याने समायिक प्रवेश परीक्षेचा भाग म्हणून घेतलेली शारीरिक क्षमता चाचणी, असा आहे ;

(प) "अध्ययन क्रम" याचा अर्थ, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणातील पदवी आणि पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, असा आहे ;

(फ) "अर्हता परीक्षा" याचा अर्थ, ज्या परीक्षेच्या आधारे एखादा उमेदवार प्रवेशाकरिता पात्र होतो अशी परीक्षा किंवा तिला समतुल्य असलेली परीक्षा, असा आहे ;

(ब) "एसएससी" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा किंवा मान्यताप्राप्त मंडळाकडून देण्यात येणारे, त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे ;

(२) या नियमांमध्ये वापरलेल्या, परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.